सं. फौ. ख. क्र.४३/२०२५ **निशाणी १७**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

नाव – नितीन जयद्रथ काकडे,

वय – ३६ वर्षे, व्यवसाय – पोशि/९९०.

पत्ता – पोलीस ठाणे वडवणी, जि. बीड.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. ए. डी. साखरे यांचे मार्फत सरतपास दु.१२.३६ वा. सुरुः**

**१.** दि.२५.१०.२०२४ रोजी मी वडवणी पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. त्या दिवशी त्यादिवशी पोह ढोबळे, पोशि मुजाळ आणि नाईकवाडे यांच्यासह वडवणी पो.स्टेशन हद्दीमध्ये पेट्रालींग करीत असताना मला स्वतःला गुप्त बातमीदारामार्फत अशी माहिती मिळाली की, मौजे पिंपरखेड येथे इसम नामे सुर्यकांत आठवले हा व्यक्ती त्याच्या पत्र्याच्या शेडमध्ये गावठी हात भट्टीची तयार दारुची चोरटी विक्री करीत आहे.

**२.** अशी माहिती मिळाल्यामुळे आम्ही सदर ठिकाणी दोन पंचांसह अचानक १८.३० वा. छापा घातला. त्या ठिकाणी छापा घातला असता एक व्यक्ती पत्र्याच्या शेडसमोर आढळुन आला. त्या व्यक्तीकडे असलेल्या प्लॅस्टीकच्या ड्रमची झडती घेतली असता त्यामध्ये गावठी हातभट्टीची दारु अंदाजे ३५ लिटर मिळून आली. सदर व्यक्तीला त्याचे नाव विचारले असता त्याने सुर्यकांत आठवले रा.पिंपरखेड असे सांगितले. त्यानुसार दोन पंचांसमक्ष पोह ढोबळे यांनी जप्ती पंचनामा तयार केला. जप्त मुद्देमालातुन एका १८० मिलीच्या काचेच्या बाटलीमध्ये रासायनिक परिक्षणाकरीता मुद्देमाल नमूना राखुन ठेवला. उर्वरित मुद्देमाल पंचांसमक्ष जागीच नष्ट केला. त्यानंतर मी स्वतः आरोपी विरुद्ध तक्रार दाखल केली.

**३.** आता मला दि. २५.१०.२०२४ रोजी चा रिपोर्ट दाखवण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील संपूर्ण मजकूर माझ्या माहीत प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१८** देण्यात येत आहे. आता मला दि.२५.१०.२०२४ रोजी चा छापील प्रथम खबरी अहवाल दाखवण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील संपूर्ण मजकूर माझ्या माहीत प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१९** देण्यात येत आहे. मी आरोपीला ओळखतो, तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. के. डी. काळे यांच्या मार्फत</u>

**४.** छापा घालण्यापुर्वी बातमी एक तास अगोदर मिळाली होती. बातमी मिळाल्याची नोंद संबंधीत रजिस्टरमध्ये केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वडवणी ते पिंपरखेड हे अंतर अंदाजे नऊ किमी असून तेथे जाण्यासाठी अंदाजे दहा मिनीटे वेळ लागतो. छापा घातला त्यावेळी पाच ते सहा लोक जमा झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी छापा घातला ते पत्र्याचे शेड रस्त्याला असून तेथे लोकांची गर्दी असते. सदर ठिकाणाच्या आजुबाजुला इतर दुकाने असून एक मोठा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या मोठ्या रस्त्याने लोकांची नेहमी ये–जा सुरु असते. शेड कोणाच्या मालकीचे आहे त्याची कागदपत्रे पाहिली नाहीत. दोन्ही पंचाना फोन करुन मी स्वतः बोलाविले होते. आरोपी हा सदर घटनेपुर्वी माझ्या पाहण्यातील आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्व पोलीस कर्मचा–यांनी संगनमताने सदर तक्रार दाखल केलेली आहे.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला केसेसचा कोटा पुर्ण करण्याचे निर्देश वरिष्ट अधिका–यांनी दिलेले असता. हे म्हणणे खरे नाही की, केसचा कोटा पुर्ण करण्याकरीता खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो अशी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये आरोपी विरुद्ध कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटा गुन्हा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटा पुरावा दिला आहे.

<u>उलटतपास दु.१२.४५ वा. पुर्ण</u>

<u>फेरतपास नाही.</u>

**दिनांकः– १२/०३/२०२६.**

| | |
|---|---|
| **समक्ष** | **श्रवणोत्तर निवेदन स्विकृत** |
| sd/– | sd/– |
| **(विष्णु द. गिते)** | **(विष्णु द. गिते)** |
| **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,** | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,** |
| **वडवणी, जि. बीड** | **वडवणी, जि. बीड** |